# स्त्री नव्या युगाची !!

**प्रा. हेमलता सुधाकर जोशी**

गृहिणी सचिव: सखी मिथ:

प्रियशिष्या ललित कलाविधे !

मनुस्मृतीला स्त्रियांनी वेळोवळी धक्के दिले आहेत. परंतु त्यांच्यातील वात्सल्य आणि कुटुंबत्सलता इत्यादी गुणांमुळे स्त्रियांनीच हा लढा कधीही निर्णायक अवस्थेत येऊ दिला नाही. आता काळाच्या ओघात आणि जगाच्या एकिकरणात मनुस्मृतीमधील कुचंबणा शिल्लक राहीलेली नाही आणि टंकलेखनापासून लष्करापर्यंत स्त्रियांचा वावर सुरू झाला आहे. त्यांच्या यशाचे प्रमाणही वाढत आहे. ते अगदी पुरूषाच्या बरोबरीने येईल परंतु त्यांच्या सोबतच्या पुरुषांनी त्यांच्यातील अहंकार जाळून टाकला पाहिजे. आणि त्यांच्याबरोबर सूर मिळवले पाहिजेत. फक्त सुर मिळण्यास उशीर स्त्री अंगणात चांदणे अंथरेल.

''घरामध्ये गृहिणी या नात्याने सचिव, एकांतात सखी तर विविध कला शिकवताना प्रिय शिष्या'' अशी भारतीय स्त्रीची भूमिका प्राचीन काळात होती. स्त्रियांच्या शालीनतेचे, मर्यादेचे, कर्तृत्त्वाचे क्षेत्र सर्वार्थाने 'गृह' घरच होते. त्या घरात ती कधी देवता, माता, भगिनी तर कधी पत्नी या विविध स्वरूपांतील आपल्या आदर्शांना जपत होती. वैदिक काळात मात्र स्त्रियांच्या बौद्धिक सामर्थ्यांचा, वाक्‌पटुतेचा, अधिकाराचा प्रत्यय आलेला दिसतो. समाजात स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच पौरोहित्य करण्याचा अधिकार होता. गार्गी, मैत्रेयी, अपाला, घोष यासारख्या स्त्रिया या क्षेत्रात मान्यवर समजल्या गेल्या.

यानंतरचा काळ मात्र स्त्रियांच्या अधोगतीचा आहे. मनुस्मृतीने जाहीर करून टाकले. लहानपणी पित्याने रक्षण करावे, तरुणपणी पतीने रक्षण करावे आणि वृद्धपणी मुलाने रक्षण करावे. पण स्त्रीला स्वातंत्र्य देऊ नये. न स्त्रीम् स्वातंत्र्यमर्हति ! यानंतर स्त्रीला मिळणारे स्थान सातत्याने दुय्यम दर्जाचेच होते. तिच्यातील नैसर्गिक, सुप्त गुणांचा विकास होण्यास संधीच मिळाली नाही.

पण नंतरच्या काळात, ब्रिटिशांच्या राजवटीतही त्यात फारसा फरक पडला नाही. समाज सुधारणेच्या चळवळी झाल्या, स्वातंत्र्य चळवळी झाल्या. देशाला स्वातंत्र्य मिळाले, लोकशाहीचे वारे वाहू लागले. देशाच्या प्रगतीची, आर्थिक, राजकीय, सामाजिक सुधारणांची घोडदौड सुरू झाली. शिक्षणाचे नवे दालन खुले झाले. पण भारतीय स्त्रीचा चेहरा मात्र स्वत:चा अस्तित्व नसलेला कोराच होता. याचा अर्थ तिच्या संवेदना मृत झालेल्या

नव्हत्या. तिच्यावर झालेल्या अन्यायाचे, अत्याचाराचे, क्रौर्याचे दर्शन वारंवार होतच राहिले. स्त्रीमुक्तीवादी चळवळी झाल्या. आज २० वे शतक संपल्यानंतर २१ व्या शतकात प्रवेश करणारी स्त्री कशी आहे? बघता बघता कालचक्र पालटलेले दिसतेय. २१ व्या शतकातील स्त्रीने केव्हाच घराचा उंबरठा ओलांडलेला आहे. शिक्षण घेऊन आत्मविश्वासान फुललेले तिचे व्यक्तिमत्त्व राजकारण, समाजकारण, औद्योगिक क्षेत्र, शिक्षण क्षेत्र या विविध ठिकाणी भरारी घेताना दिसत आहे.

महाराष्ट्रात स्वतंत्र महिला आयोग अस्तित्वात आला. व्यापक महिला धोरण स्वीकारणारे महाराष्ट्र सरकार 'पहिले सरकार' ठरले. जागतिक पातळीवर महिलांच्या विकासासाठी विविध परिषदा, संमेलन भरवली जात आहेत. चीनची राजधानी 'बिजिंग' या ठिकाणी भरलेल्या महिला अधिवेशनात अनेक चर्चा, प्रश्नांचे ऊहापोह होत आहेत. भारतीय स्त्रीची अस्मिता, आत्मविश्वास नव्यान फुललेली आहे. महिलांना आर्थिक स्वातंत्र्य देऊन खऱ्या अर्थाने सबळ करून आर्थिक प्रवाहात आणणे आणि त्यांच्यातील उत्पादक शक्तीचा योग्य उपयोग करून घेणे असा उदात्त हेतू या सर्व योजनांच्या मागे दिसत आहे.

कौटुंबिक जबाबदारी समर्थपणे पेलणाऱ्या महिलांनीसुद्धा हे घराबाहेरच आव्हान मोठ्या जिद्दीने स्वीकारलेले दिसत आहे. तिच्यामध्ये असलेल्या उपजत गुणांचा उद्योजकतेला पोषक पद्धतीने उपयोग होतो. तिची संसार चालविण्याची पद्धत एखाद्या उद्योगाच्या व्यवस्थापनाशी अगदी मिळती जुळती असते. निर्णय घेणे, साधकबाधक विचार करणे, संयोजन करणे, हातात घेतलेले काम शेवटपर्यंत न खचता पूर्ण करणे. आकस्मिक नव्याने येणाऱ्या समस्यांना धीराने तोंड देणे असे किती तरी गुण तिच्यात जात्याच असतात. यामुळेच ती कर्तबगार पंतप्रधान, उद्योजक, संचालक अशी पदे यशस्वीरीत्या सांभाळू शकते. स्त्रीची जिद्द, खंबीरपणा, संयम, धडपडी वृत्ती, कष्ट करण्याची तयारी सर्वच क्षेत्रात प्रकर्षाने उठून दिसते. याच्या जोडीला तिच्यामध्ये असणारी ममता, कारुण्य, कनवाळूपणा हे गुण आपल्या हाताखाली असणाऱ्या अधिकारीवर्गाला, कामगारवर्गाला समजावून घेताना उपयुक्त ठरतात. त्यांचे प्रश्न, त्याच्या अडचणी माणुसकीच्या नात्याने तो सहज समजू शकते. आणि त्यांची उकलही करू शकते.

आज औद्योगिक क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण खूपच वाढलेले दिसते आहे. एकूण जागतिक अर्थव्यवस्थेच्या तुलनेत हा वाटा ५५ टक्केच आहे. त्यात वाढ होण्याची गरज आहे. नव्या पिढीने, तरुण मुलींनी जास्तीत जास्त संख्येने या क्षेत्रात येण्याची गरज आहे. नवी धोरणे, नव्या योजना आकर्षक आहेत. वरवर पाहता सारे चित्र गोंडस दिसते. लोभस दिसते. पण वास्तव चित्र कसे आहे? शिक्षण, प्रशिक्षण घेऊन प्रगल्भ झालेली आधुनिक स्त्री अगदी अलगद यशाचे शिखर गाठू शकते का? थोडक्यात बोलायचे तर हा मार्ग गुलाब पुष्पांचा आहे का काटेरी आहे?

औद्योगिक क्षेत्रात यशस्वी झालेल्या विविध महिला उद्योजकांशी झालेल्या चर्चेतून असे लक्षात आले की हा मार्ग दिसतो तेवढा सोपा नाही. त्यामध्ये महिलांच्या प्रवेशाला, विकासाला अडसर ठरणारे असंख्य प्रश्न आहेत, समस्या आहेत. ही अडथळ्याची शर्यत पार करताना स्त्रीची दमछाक होते, जबाबदारी दुप्पट होते, शारीरिक आणि मानसिक शक्ती खलास होते. पुर्वीपेक्षा तिच्यावरच्या जबाबदारीचे ओझे असंख्य पटीने वाढलेले आहे.

या समस्यांचे ढोबळपणे वर्गीकरण करताना कौटुंबिक, आर्थिक, व्यावसायिक आणि सामाजिक स्वरूपात करावे लागेल.

आपल्या आकांक्षाचे, कर्तृत्वाचे पंख पसरून औद्योगिक क्षेत्रात, विविध व्यवसायांत, नोकरी क्षेत्रात भरारी घेऊ पाहणाऱ्या आधुनिक स्त्रीच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्णपणे अजिबात कमी झालेल्या नाहीत. कौटुंबिक जबाबदारी तिच्या मनावर झालेल्या पूर्वपरंपरागत संस्कारामुळे आणि नैसर्गिक प्रवृत्तीमुळे ती टाळूच शकत नाही. निसर्गदत्त मातृत्त्वाची जबाबदारी ऐन तारुण्यात पार पाडावी लागते. मुलांना जन्म देणे, वाढवणे, संगोपन करणे, त्यांचे आजार अशा विविध प्रश्नांना तोंड देतांना. तिची त्रेधा तिरपीट उडते. त्यात ती सर्वार्थाने गुरफटली जाते. मुल मोठी झाली की शिक्षणाचे प्रश्न, संस्कारांचे, अभ्यासाचे प्रश्न, सुरक्षिततेचे प्रश्न! मोठ्या हौसेने सुरू केलेल्या उद्योगाकडे लक्ष द्यायचे तर सर्वांनाच घरात व्यवसाय सुरू करता येत नाही. उद्योगाचे, कामाचे क्षेत्र घरापासून दूर असले तर मुलांचे काय? आज शहरात आढळणारे चित्र थोडेसे वेगळे आहे. चौकोनी कुटुंबाला 'पाळणाघर' वाचून पर्याय नाही. पाळणाघरात मुलांना ठेवून ती कामावर जाते. पण मनात कुठेतरी टोचणी लागते. अपराधीपणाची भावना अस्वस्थ करते. आपल्या लहानग्यावर आपण अन्याय तर करत नाही ना? आपल्या मुलाला, मुलीला पाळणाघरात व्यवस्थित पाहतील ना? ते रडत असतील का? असे असंख्य प्रश्न तिच्या मनात येताच कामात लक्ष लागत नाही. त्यावर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. हा मानसिक संघर्ष खरोखरीच जीवघेणा असतो! मुले मोठी झाली तर उत्पन्न होणाऱ्या समस्यांचे चित्र आणखी गुंतागुंतीचे होऊ शकते.

घरामध्ये वृद्ध सासू, सासरे, आई, वडील असतील तर त्यांच्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. जरी घरकामाला नोकर माणसे ठेवली तरी इतरही अनेक प्रश्न असू शकतात. त्याचे आजारपण, त्यांची चीडचीड, त्यांची देखभाल तिलाच करावी लागते. तोंड द्यावे लागते. याबरोबरच घरात येणारे पाहुणे, आले–गेले यांची सरबराई, आदरतिथ्य करण्याची गृहिणीपदाची शारीरिक आणि मानसिक जबाबदारी पण तिनेच घ्यायची हा तर अलिखित नियमच असतो !

या सर्वांवर कडी म्हणजे जोडीदाराची भूमिका, त्याचा दृष्टीकोन ! आपली पत्नी एवढ्या जबाबदाऱ्या पेलताना तिच्याकडे थंडवृत्तीने पाहणारा, तिच्याकडे दुर्लक्ष करणारा, तिचा दुस्वास करणारा जोडीदार हाच या प्रगतीत फार मोठा अडसर, अडथळा ठरत असतो. ''आपल्या पत्नीवर मनापासून प्रेम करणारा प्रेमळ पती'' हे त्याचे स्वरूप कायम राहीलच अशी खात्री नसते. तो जर दिलदार, प्रेमळ, तिची कदर करणारा असेल तर त्याचा दृष्टिकोन स्फूर्तिदायकही ठरतो. दिलासा देतो. पतीचे सहकार्य, आपुलकी मिळाली तर स्त्री खऱ्या अर्थाने, समाधानाने, उत्साहाने फुलते, यशस्वी होते. प्रत्येक कर्तृत्ववान स्त्रीच्या मागे तिच्या पतीराजाची मित्रत्वाची, सहकार्याची भूमिका असते यात वादच नाही. पण असे नसेल तर? बऱ्याच वेळा अनुभव असा येतो की हे सहकार्य, ही जाणीव मनापासून मिळत नाही. आपली बायको आपली स्पर्धक होते आहे. आपल्यापेक्षा वरचढ होत चालली आहे असे भाव मनात धरून तिच्याबद्दल संशय, गैरसमज, मत्सराची अढी त्याच्या मनात निर्माण होते. तिच्या गुणांचे मनापासून कौतुक करण्याऐवजी तिचे दोष दाखवणे, तिचा अपमान करणे, छद्मपणे बोलणे आणि तिच्या उत्साहाचे खच्चीकरण करणे असे अनेक नवरोजींचे पवित्रे असतात. तिच्या कार्यक्षमतेबद्दल अविश्वास, टिंगलीची भावना तर सातत्याने अनुभवाला येते.

शिक्षण क्षेत्रात अत्यंत मनापासून काम करणाऱ्या कर्तबगार प्राध्यापक पत्नीला पतीराज सहजपणे सुनावतात. ''तुझे ज्ञान तू कॉलेजमध्ये नाही तर शाळेत पाजळ ! आम्हाला शिकवू नकोस !'' बरे अशा वक्तव्यावर चिडून तिने जर आपली प्रतिक्रिया व्यक्त केली, आपली बाजू समर्थपणे मांडण्याचा प्रयत्न केला तर प्रेमळ नवऱ्याचे हिटलरमध्ये रूपांतर होते, वाद सुरू होतात. घरात भांडण, अस्वस्थता निर्माण होते. याचा परिणाम मुलांवर होतो 'घराचे घरपण टिकत नाही', बाहेरच्या कार्यात जास्त इंटरेस्ट घेते, मुलांकडे लक्ष देत नाही. अशा शेजाऱ्या पाजाऱ्यांच्या टिकेचीही लक्ष्य बनते. स्त्रीच्या उभारीचे, उत्साहाचे खच्चीकरण असे कुटुंबापासून, शेजाऱ्यापाजाऱ्यांपासून व्हायला सुरूवात होते.

आपण उभारलेल्या उद्योगाच्या, व्यावसायिक क्षेत्रात किंवा नोकरीच्या ठिकाणी ती कोणत्याही स्थानावर असली तरी तिला मिळणारा दर्जा दुय्यम स्वरूपाचाच रहातो. तिची बुद्धिमत्ता, तिचे कौशल्य याबद्दल एक प्रकारची संशयाची, अविश्वासाची भावना असते. कॉम्प्युटरच्या व्यवसायाची धुरा यशस्वीपणे सांभाळणाऱ्या इंजिनियर महिलेने कळवळून सांगितले, "I have to prove my self. They don't trust my technical knowledge, my skill ! They forget that I am also a computer engineer !"

कारखान्यात अधिकारी वर्गाला, कामगारांना महिला बॉसचे वर्चस्व सहन करणे मनापासून आवडत नाही. अशा वेळी मिळणारा प्रतिसाद अत्यंत थंड आणि असहकाराचा असतो. तिला त्यांचे मनापासून सहकार्य मिळेलच अशी खात्री नसते. तिच्यावर सर्व जबाबदाऱ्या ढकलून ऐन वेळी सहकार्य नाकारून तिची फजिती कशी करता येईल, तिला अकार्यक्षम कसे ठरवता येईल यातच त्यांची बौद्धिक शक्ती वाया जात असते.

घराबाहेरच्या सर्व कार्यक्षेत्रांत 'स्पर्धा' असतेच. या स्पर्धेत तिला टिकून राहावेच लागते. स्त्री म्हणून 'सवलत' मिळवणे कोणत्याही कामसू, अभिमानी स्त्रीला आवडत नाही. जात्याच कष्टाळू वृत्तीच्या, प्रामाणिकपणे काम करणाऱ्या स्त्रियांना कामाचे दुःख होत नाही. हे आव्हान ती मोठ्या उत्साहाने, आत्मविश्वासाने पेलायचा प्रयत्न करते. पण त्याच्या बदल्यात येणारी उपेक्षा, असहकार, अविश्वास आणि दुय्यम दर्जा तीचे उत्साहाचे पंख कापून टाकतात. ती नाउमेद होते.

औद्योगिक क्षेत्रात साधारणपणे तीन कारणांनी महिलांचे आगमन होते. पतीचा उद्योग, व्यवसाय त्याच्या आकस्मिक निधनाने तिला सांभाळण्याची जबाबदारी घ्यावी लागते. घरामध्ये सुरवातीपासून उद्योगक्षेत्राशी संबंधित असे वातावरण असते. तेव्हा पतीला सहकार्य देण्यासाठी ती या क्षेत्रात येते. काही वेळा अत्यंत निकृष्ट आर्थिक परिस्थितीच्या कारणांनी ती लहान सहान उद्योग व्यवसाय करून कुटुंबाचे पोषण करणे याच हेतूने सुरवात करते. कालांतराने या व्यवसायात भरभराट होऊन ती मोठी होते. तर काही अत्यंत बुद्धिमान, व्यावसायिक कौशल्य प्राप्त केलेल्या स्त्रिया करियर, महत्त्वाकांक्षा सिद्ध करण्याच्या हेतूने यात पदार्पण करतात.

हे सर्व करताना आर्थिक अडचणी अनेक प्रकारच्या असू शकतात. उद्योग उभारणीसाठी लागणारे भांडवल, जागा, कामगारवर्ग, जाहिरात, बाजारपेठ अशा एकामागून एक समस्यांना तिला तोंड द्यावेच लागते. कर्ज काढावे लागते, फेडावे लागते. व्यवसायात होणाऱ्या नफ्या–तोट्याचे गणित डोक्यात ठेवावे लागते. वेळप्रसंगी स्वतःचे दागिने विकून उद्योग सावरावा लागतो. अशी उदाहरणे असंख्य आहेत. आर्थिक व्यवहारांचे मर्म समजणे आवश्यक ठरते. महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतात. या सर्व प्रकारांचे तिच्यावर एक प्रकारचे टेन्शन येते.

कामाच्या तासांचे गणित चुकते. वेळी अवेळी घरी यावे लागते. पुरुषवर्गाशी व्यावसायिक स्वरुपाच्या चर्चा कराव्या लागतात. व्यवसायाचा एक औपचारिक भाग म्हणून औपचारिक समारंभ, पार्टी यांना हजर राहावे लागते. अशा वेळी संयमपूर्ण वागणे, असावे का मनमोकळे वागणे असावे असा संभ्रम पडतो. संयमीवृत्ती दाखवली तर ती माणूसघाणी ठरते. मनमोकळी राहिली तरी पंचाईत होते. तिच्या बोलण्या–चालण्यावर टीका होते. वादळी चर्चा होतात. घरात आणि घराबाहेर अशा दोन्ही ठिकाणी तिची 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' अशी अवस्था होते. या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून शांतपणे आपले ध्येय गाठणे ही खरोखरच तारेवरची कसरत असते. मनात संतापाचे, दु:खाचे डोंब उसळतात. मनाचा समतोलपणा राखण्यात तिची प्रचंड मानसिक शक्ती खर्च होते.

बऱ्याच वेळा व्यवसायाच्या निमित्ताने तिला बाहेरगावी जावे लागते. हॉटेलमध्ये मुक्काम करावा लागतो. आपल्या स्त्रीत्वाच्या सर्व मर्यादा सांभाळून खंबीर उद्योजकांची प्रतिमा टिकवणे हे एक फार मोठे चॅलेंज ठरते. घरापासून कित्येक दिवस बाहेरही राहावे लागते. व्यावसायिक, आर्थिक आणि कौटुंबिक तणावांना सामोरे जाताना अनेक वेळा तिची वाटचाल ही अत्यंत एकाकी असू शकते.

जनसंपर्क ठेवावा लागतो. कारखान्यातील वातावरण उद्योगाला पोषक ठरावे म्हणून विविध योजना, विकास कार्ये करावी लागतात. तरीही कारखान्यात संप होतात. बहिष्कार टाकले जातात. विविध कारवायांना खंबीरपणे तोंड द्यावे लागते. सर्वात महत्त्वाचे टेन्शन म्हणजे उत्पादनाचा दर्जा उत्तम राखण्याची फार मोठी जबाबदारी तिचीच असू शकते. आजच्या स्पर्धेच्या युगात 'क्वालिटी' टिकवणे, वाढवणे हे फार महत्त्वाचे काम आहे. उत्पादन झाल्यानंतर त्याची योग्य विक्री होण्यासाठी चांगली बाजारपेठ कशी मिळेल याचा अभ्यास करावा लागतो. योजना आखाव्या लागतात.

बऱ्याच महिला उद्योजकांची एक महत्त्वाची अडचण म्हणजे त्यांना कायद्याचे व्यवस्थित ज्ञान नसते. जरी वकीलवर्गाचे साहाय्य घेतले तरी स्वत:ला उद्योगाशी संबंधित असणाऱ्या कायद्यांची माहिती असल्यास फायद्याचे ठरते. पण याबाबत त्यांना परावलंबी व्हावे लागते.

पत्रव्यवहार, बँकांचे व्यवहार, निरनिराळ्या करांची माहिती असणे आवश्यक ठरते. यासंदर्भातील आणखी एक अडचण म्हणजे इंग्रजी भाषेचे अपुरे ज्ञान ! कोणी कितीही कांगावा केला, मातृभाषेचा अट्टाहास धरला तरी आपल्या देशात महत्त्वाच्या कार्यालयांत आधुनिक क्षेत्रात इंग्रजी भाषेचाच वापर होतो. औद्योगिक क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान आणि त्याचा वापर या सर्वांवर इंग्रजी भाषेचे वर्चस्व आहे. अशा वेळी पत्रव्यवहार करताना. आपली बाजू मांडताना इंग्रजी भाषेत व्यवस्थित लिहिता आले पाहिजे, बोलता आले पाहिजे याची जाणीव होते. हे ज्ञान नसेल तर एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होतो.

दुर्दैवाने आपल्या देशातील सध्याचे वातावरण अनेक दृष्टीने गढूळ बनलेले दिसते. भ्रष्टाचार आणि नीतिभ्रष्ट वातावरणाचे सावट स्त्रियांच्या आर्थिक विकासावर फार मोठा परिणाम करू शकते. मनात नसतांना व्यावसायिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी महिलांना या समस्येला तोंड द्यावे लागते. त्यांच्यावर अनिष्ट गोष्टी करण्याचे दडपण येऊ शकते. अशा नीतीभ्रष्ट वातावरणात, खंबीरपणे दूर रहाणाऱ्या उद्योगातील स्त्रियांना 'अप्रियता', असहकाराचे बळी व्हावे लागते. तिची व्यावसायिक कामे पूर्ण होऊ शकत नाहीत. त्याकडे साफ दुर्लक्ष केले जाते.

हास्यास्पद वाटेल पण स्त्रियांचा शत्रूही स्त्रियाच असतात. द्वेष, मत्सर, हेवेदावे करून तिचा पाय मागे ओढण्यात तिच्या स्त्री शत्रू स्पर्धक कुठेही कमी नसतात.

अर्थार्जन करताना, उद्योग सांभाळताना तिला 'व्यक्तिमत्व विकास' करण्याचे फार महत्व वाटते. आपल्यातील गुणांचे अधिक चीज व्हावे म्हणून आपल्याला अनेक गोष्टी आत्मसात करायच्या आहेत असे तिला कितीही वाटले तरी अनुकूल वातावरण नसेल तर तिच्या व्यक्तिमत्व विकासाला मर्यादा पडतात.

नव्या आर्थिक धोरणानुसार भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास घडवताना खुल्या बाजारीकरणावर भर देण्यात येणार आहे. अंतर्गत व्यापार आणि उत्पादन, आंतरराष्ट्रीय व्यापार, भांडवल आणि तांत्रिक देवाण–घेवाण यावरील निर्बंध सैल करून अर्थव्यवस्थेचे शिथिलीकरण करण्यात येणार आहे. आर्थिक व्यवहारांत मोकळेपणा आणण्याचा प्रयत्न होणार आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण (ग्लोबलायझेशन) करण्याचा प्रयत्न करताना 'निर्यातीवर' भर असणार आहे. अंतरराष्ट्रीय बाजारपेठांचा विचार करून उत्पादन व्यवस्था करावी लागेल. त्यात सरकारचा हस्तक्षेप कमी असेल. म्हणजे लायसेन्स, परमिट, कंट्रोल व्यवस्थेवर मुरड आली. या सर्वांचा महिला उद्योजकतेवर फार मोठा परिणाम होऊ शकतो. या स्पर्धेत स्त्रीला उतरावे लागेल. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी उद्योगाचे आधुनिकीकरण करण्याचे आव्हान तिला स्वीकारण अपरिहार्य ठरते. आधुनिक तंत्रांचा वापर करण्याची गरज फार प्रचंड वाढणार आहे. म्हणजे पर्यायाने स्त्रीला प्रशिक्षणाची गरज आहे. हे प्रशिक्षण मिळाले नाही तर 'अकार्यक्षम, अकुशलतेचा' छाप तिच्यावर बसून या स्पर्धेतून ती दूर फेकली जाईल. या सर्व प्रकारांचे प्रचंड मानसिक दडपण तिला सहन करावे लागणार आहे.

एकामागून एक अशा असंख्य प्रश्नांना तोंड देणाऱ्या उद्योजक महिलेची अवस्था सर्व आघाड्यांवर लढणाऱ्या एकाकी योध्द्याप्रमाणे तर होणार नाही ना? आणि जर सर्वच चित्र एवढे निराशाजनक असेल तर स्त्रियांनी रणांगणातून पळ काढावा का? मनोधैर्य खचून आपल्या कौशल्याची, संयमाची, चांगली गुणांची शस्त्रे खाली टाकावी का? हाच खरा प्रश्न आहे. नव्हे या प्रश्नातच तिला खरे आव्हान आहे? या प्रश्नांची नुसती उत्तरे ती कशी देणार? त्यांच्याशी सामना कसा करणार?

पण प्रत्येक नाण्याच्या दोन बाजू असतात. 'रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उष:काल' या न्यायाने केवळ अडचणींचा पाढा वाचण्यापेक्षा त्यांच्यावर मात कशी करता येईल हा विचार महत्त्वाचा आहे, विधायक आहे. स्त्री शक्तीचे खरे स्वरूप अशा संकटसमयीच फार प्रगल्भपणे जागृत होऊ शकते. प्रत्येक स्त्रीने तीन 'पी' चे महत्त्व समजावून घ्यावे. तिच्या व्यक्तिमत्त्वात हे तीन 'पी' प्रामुख्याने आढळतात. "P for Patience, P for Perseverence, P for Perfection!" चिकाटी, संयम, दीर्घोद्योग आणि परिपूर्णतेकडे जाण्याचा तिचा ध्यास कोणत्याही अडचणींवर सहजगत्या मात करू शकतो!

महिला विकासाला अडसर जसे आहेत तसे उत्तेजन देणारेही वातावरण आपल्या देशात आहे. आणि म्हणूनच आता असंख्य महिला या क्षेत्रात येण्याची धडपड करीत आहेत. भारतासारख्या देशात लोकशाहीचा स्वीकार झाल्यामुळे प्रत्येक भारतीय स्त्रीला सन्मानाने जगण्याचा, शिक्षण घेण्याचा, विचार स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क घटनेने सर्वप्रथम बहाल केलेला आहे.

स्वातंत्र्यलढ्यात भारतीय स्त्री शक्तीचे फार मोठे योगदान झालेले आहे. महात्मा गांधींसारख्या जेष्ठ राष्ट्रपित्याचा या सहभागाला सक्रिय पाठिंबा होता. कुटुंबात स्त्रीला शिक्षण दिले तर ती सर्व घराचा उद्धार करील यावर त्यांचा गाढ विश्वास होता. 'Educate the women. And you will educate the nation.' हा त्यांनी मांडलेला फार मोठा अर्थपूर्ण विचार होता.

आता शिक्षण क्षेत्रात मुलींचे स्थान आघाडीवर आहे. दरवर्षी जाहीर होणाऱ्या परीक्षांच्या निकालांकडे नजर टाकली तर हे ताबडतोब ध्यानात येते. १२वी परीक्षा झाल्यानंतर निरनिराळ्या 'व्यावसायिक क्षेत्रांची असंख्य दालने तिच्यासाठी आज खुली आहेत. निरनिराळ्या प्रकारचे कोर्सेस शिकून, तंत्रज्ञान आत्मसात करून कॉम्प्युटरसारख्या क्षेत्रातही कर्तबगारी करण्याची फार मोठी सुसंधी आजच्या नव्या पिढीला मिळत आहे. हे शिक्षण घेऊन, आपला व्यवसाय उभा करून त्या मानाने जगू शकतात. हा त्यांचा आत्मविश्वास अधिकाधिक वाढवणारे पोषक, शैक्षणिक वातावरण भोवताली आहे.

खेड्यात छोटे–छोटे लघुउद्योग करता येतील. तर शहरात ब्युटी पार्लर, हेल्थ क्लब, जाहिरात व्यवसाय, लायब्ररी, वृत्तपत्र व्यवसाय, सेवा, फॅशन डिझायनिंग, प्रिंटिंग, लेदर पर्सेस, कपडे, फूड प्रॉडक्टस्, संगणक सेवा अशी विविध प्रकारची क्षेत्रे आज तिच्यासाठी उपलब्ध आहेत. त्यात त्यांना आपले कौशल्य दाखवून आर्थिक उत्पादकतेला हातभार लावण्याची फार मोठी संधी उपलब्ध झालेली आहे.

शिक्षणाने आधुनिक स्त्रीचे व्यक्तिमत्त्व प्रगल्भ झाले आहे तर उद्योग व्यवसाय क्षेत्रातील अनुभवांमुळे तिच्या कर्तृत्त्वाला विशेष झळाळी प्राप्त झालेली आहे.

पुण्यासारख्या शहरात महिला वर्गाचा या क्षेत्रात प्रचंड सहभाग दिसून येतो. 'Advance Exhibitions' च्या संचालिका श्रीमती माधुरी पाटील यांचा गृहोपयोगी, इलेक्ट्रॉनिक्स आणि विविध वस्तूंचे औद्योगिक प्रदर्शन भरवण्याचा हातखंडा आहे. केवळ तीन ते चार वर्षात पुणे, नगर, नाशिक, औरंगाबाद अशा विविध शहरांत २५ प्रदर्शने भरवून त्यांनी फार मोठे रेकॉर्डच केले आहे. या प्रदर्शनांमुळे उद्योजकांना, महिला उद्योजकांना एक छानशी बाजारपेठ आपोआपच मिळते. कारण त्यामध्ये केवळ प्रदर्शन हा हेतू नसून विक्री हेही उद्दिष्ट असते. या क्षेत्रातील त्यांचे कार्य फार मोलाचे आहे.

कोल्हापूरच्या शैलजा सूर्यवंशी यांच्या कारखान्यात तयार होणाऱ्या लोखंडी आकर्षक खुर्च्या, सोफा सेटस्, झोपाळे, स्वयंपाकघरात उपयुक्त ठरणाऱ्या मांडण्या औद्योगिक प्रदर्शनाचे आकर्षण ठरतात. गावोगावी या वस्तूंचे औद्योगिक प्रदर्शन भरवून विक्री करणाऱ्या शैलजाताई मोठ्या जिद्दीच्या आहेत, उत्साही आहेत!

मुंबईच्या सुनंदा राऊत यांनी 'सोना प्रिंटर्स' चा प्रिंटिंग व्यवसाय मोठ्या कौशल्याने हाताळलेला आहे. पुण्याच्या सुमतीबाई हार्डीकरांची नर्सरी दृष्ट लागण्यासारखी आहे. या नर्सरीत विविध रोपे तयार करून त्यांची विक्री त्या करतात. याशिवाय त्यांच्या 'नारायण गुलकंदा' च्या उत्पादनाला पण खूप मागणी असते. उन्हाळ्यात त्यांच्या 'सहस्त्र नारिंगी सरबताला' फार मोठा प्रतिसाद मिळाला. चिंचवड येथील पुष्पलता बांठिया यांचा 'स्प्रे ऑल' हा औद्योगिक क्षेत्रासाठी लागणाऱ्या रंगांचा फार मोठा कारखाना आहे. घरातील आर्थिक समस्या सोडवताना अगदी थोड्याशा भांडवलावर हा उद्योग सुरू करून आज त्या त्या क्षेत्रातील फार मोठ्या महिला उद्योजक झालेल्या आहेत.

श्रीमती प्रभा ठकारांनी छंद म्हणून हौसेने शिक्षण घेऊन जोपासलेल्या बाटिक कला कौशल्याचे आज फार मोठ्या आंतरराष्ट्रीय उद्योगात रूपांतर झालेले आहे. "Dimpex International Exporters" असे त्यांच्या औद्योगिक क्षेत्राचे नाव आहे. त्यामध्ये तयार झालेल्या बाटिक प्रिंटच्या साड्या, पंजाबी कुर्ते, पर्सेस, कुशन कव्हर्स यांना परदेशांत फार मोठी मागणी असते. रेशमा होडीवाला यांच्या लेदर गार्मेंटस्ना पण परदेशांत फार मोठी मागणी आहे. श्रीमती मंगला धर्माधिकारी यांचे लक्ष्मी एंटरप्रायझेस म्हणजे कलाकौशल्याच्या नमुन्यांचे रंगीबेरंगी क्षेत्रच! त्यांचा व्यवसाय मोठा कलात्मक आहे. विविध प्रकारच्या हॅण्डबॅग्ज, शबनम, पिशव्या, महाराष्ट्रीयन वैशिष्ट्यपूर्ण चंची या सर्व प्रकारांवर नाजूक नक्षीकाम, आकर्षक रंगसंगती असल्यामुळे या वस्तूंची लोकप्रियता सतत वाढत असते. अशा किती तरी कर्तबगार महिलांची नावे औद्योगिक क्षेत्रात आघाडीवर आहेत. त्यांनीही अनेक समस्यांना, अडचणींना तोंड दिले आहे. त्यांनाही आर्थिक समस्या आल्या असतील, काही वेळा अपयशही आले असेल. पण त्या सर्वांवर धैर्याने मात करून त्यांनी आपली यशस्वी वाटचाल आज चालू ठेवली आहे.

श्रीमती मीनाक्षी दाढे यांच्या जिद्दीचे, धडपडीचे उत्तम फलित म्हणजे 'भगिनी निवेदिता बँके' ची स्थापना हे होय. आज या बँकेच्या अनेक शाखा पुण्यात आणि पुण्याबाहेर कार्यरत आहेत. 'महिलांनी, महिलांसाठी चालवलेल्या या बँकेतील सर्व व्यवहार आणि जबाबदाऱ्या महिलाच सांभाळतात'. नवीन उद्योग सुरू करण्याची तडफ असणाऱ्या उत्साही महिलांना या बँकांतर्फे कर्ज मिळू शकते.

महिलांनी उद्योजकतेकडे वळावे यासाठी महाराष्ट्र सरकारने १९७५ साली महिला आर्थिक विकास मंडळाची स्थापना केली. महिलांचे प्रशिक्षण, संरक्षण, स्वयंरोजगार, पुनर्वसन अशा अनेक गरजा ओळखून महिलांना अर्थार्जनास साहाय्य देणाऱ्या योजना आखण्यात आल्या आहेत. माविम, मिटकॉन, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्यामार्फत सक्रिय योजना आखल्या जात आहेत. त्यातील विशेष म्हणजे महिला उद्योजकांची जिल्ह्याच्या ठिकाणी दोन–दोन दिवसांची छोटी शिबिरे भरवणे, महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे प्रदर्शने भरविणे अशा स्वरूपाचे आहे. महिला उद्योजक बनण्यासाठी लागणारे विविध मार्गदर्शनही या शिबिरात दिले जाते. या व्यतिरिक्त समाजकल्याण खाते, भारतीय स्टेट बँकेची स्त्री–शक्ती योजना अशा विविध स्वरूपांत स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात साहाय्य करण्यास पुढे आलेल्या आहेत.

४ मे १९८५ साली श्रीमती प्रभा ठकार आणि त्यांच्या औद्योगिक क्षेत्रातील सहकारी भगिनींनी मोठ्या उत्साहाने पुढाकार घेऊन पुण्यामध्ये 'विमा' ही संस्था स्थापन केली. 'विमा' म्हणजे 'Association of Women Entrepreneurs / Industrialists of Maharashtra'. महिला उद्योजकतेच्या विकासाच्या दृष्टीने या असोसिएशनचे कार्य फार चांगले चालले आहे. पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर, गोवा अशा विविध शहरांत 'विमा'च्या शाखा आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात ५०० पेक्षा जास्त महिला उद्योजक त्याच्या सदस्या आहेत. या संस्थेतर्फे उद्योजकतेला प्रेरणा देणारे अनेक कार्यक्रम आणि योजना आखल्या जातात. परिसंवाद, शिबिरे, चर्चासत्रे, नामवंत उद्योजकांची व्याख्याने होतात, महिलांना प्रशिक्षण देणारे, मार्गदर्शन करणारे कार्यक्रम होतात. महिला उद्योजकांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्री यांचे आकर्षक आयोजन 'विमा बाजार' या भव्य औद्योगिक प्रदर्शनात केलेले होते.

१९९४ साली महाराष्ट्र सरकारने नवे महिला धोरण जाहीर केले. या विशाल धोरणामुळे स्त्री–विकासाच्या आकांक्षा पुन्हा नव्याने पल्लवित झालेल्या आहेत. स्त्रियांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक विकासावर त्याचा भर आहे. स्त्रियांना राखीव जागांबरोबरच, आर्थिक साहाय्य पण नवनवीन प्रकल्पांसाठी, स्वयंरोजगारांसाठी, उद्योगासाठी मिळू शकणार आहे. या सवलतींचा जास्तीत जास्त फायदा नव्याने पुढे येणाऱ्या तरुण महिला उद्योजकांनी घेतला पाहिजे. याशिवाय शहरात औद्योगिक प्रशिक्षण देणाऱ्या विविध संस्था असतात.

एवढी आशादायक पार्श्वभूमी निर्माण झाल्यानंतर अडचणींवर मात करण्याचे सामर्थ्य स्त्रियांच्या मनगटात नक्कीच येईल. आपल्यातील सुप्त गुणांचे महत्त्व आजची आधुनिक स्त्री ओळखून आहे. आपले पंख पसरून कर्तृत्त्वाची भरारी घेणाऱ्या स्त्रीचे घराकडे दुर्लक्ष होईल अशी भीती कुणी बाळगू नये. प्रत्येक स्त्रीला आपले घर, आपली माणसे अत्यंत प्रिय असतात. त्या घराचे स्वास्थ्य, सुरक्षितता, आनंद हाच तिचा आनंद असतो. मात्र त्या घरातील सूर सुसंवादी असावेत, घराला घरपण देणारी माणस असावीत. भावनांचे, ओलाव्याचे, ममतेचे नाजूक अनुबंध निर्माण व्हायला पाहिजेत. पुरूषांनी तिचा आदर केला पाहिजे. तिला सहकार्याचा हात दिला पाहिजे. तिच कर्तृत्व घरात आणि घराबाहेर सर्वार्थाने फुलले पाहिजे. ही जबाबदारी सर्वांचीच आहे. 'मिले सूर मेरा तुम्हारा' असे घरातील वातावरण असेल तर बाहेरचे वातावरणही मधुर सुरांनी भरून जाईल. घराबाहेर यशस्वी उद्योजक म्हणून वावरणारी स्त्री घरातील शांतता आणि आनंद टिकवणारी, सहचारिणी आहे, शक्ती आहे. अशीच श्रद्धा प्रत्येक जोडीदाराने आपल्या मनात बाळगणे योग्य ठरेल.

२१वे शतक हे खऱ्या अर्थाने कर्तृत्ववान महिलांचे शतक ठरणार आहे यात वादच नाही. या नव्या जगातील कार्यक्षेत्र किती विस्तीर्ण असेल? तर Sky is the limit असे म्हणावे लागेल. हे उद्योजकतचे, आर्थिक प्रवाहात सामील होण्याचे आव्हान स्वीकारणाऱ्या प्रत्येक स्त्रीच्या मनात ध्येयवादी विचार कसा असेल?

Woods are lovely dark and deep,

But I have promises to keep,

And miles to go before I sleep

And miles to go before I sleep!

(Robert Frost)

**प्रा. सौ. हेमलता सुधाकर जोशी**,

फ्लॅट नं.१०, राजमयूर सोसायटी (२)

एरंडवणे, पर्सिस्टंट सॉफ्टवेअरच्या मागे,

कर्वे रोड, पुणे ४११००४

फोन नं. – ०२० – २५४४०५७६